

वो भूली दास्तां... जय संतोषी मां

अलिकडेच प्रदर्शित झालेल्या *मां संतोषी मां*मुळे इंडस्ट्रीत पुन्हा एकदा संतोषी मातेच्या नावाचा दबदबा निर्माण झालाय. या निमित्ताने रजनीकुमार पंड्या यांनी लिहिलेल्या जुन्या *जय संतोषी मां*च्या निर्मितीचा हा रंजक इतिहास...

दिवाणखान्याबाहेर ओसरीवर बसलेल्या त्या माणसाची नजर खोलीभर भिरभिरू लागली. पार्ल्याच्या ए. व्ही. रोडलगत असलेल्या त्या घरात रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांचा आवाज भरून राहिला होता. अभ्यागताची नजर कोपऱ्यात मांडून ठेवलेल्या तोतिंग शिल्डवर पडली. त्यावर अक्षरं कोरली होती, 'कवी रामचंद्र द्विवेदी प्रदीपजींना श्रेष्ठ काव्यरचनेसाठी राष्ट्रपतींकडून हे सन्मानचिन्ह...'

मात्र त्या सन्मानाचा मानकरी कवी प्रदीप यांचं दर्शन काही होत नव्हतं. पाहुण्याची चुळबूळ वाढू लागली. 'देख तेरे संसार की हालत...', 'आओ बच्चों तुम्हे दिखाए...' किंवा 'अय मेरे वतन के लोगों...' अगदी मागच्या जमान्यात गेलात तर 'चल चल रे नौजवान...' वा 'घर घर में दिवाली है...'सारखी अर्थपूर्ण गीतं ज्यांच्या लेखणीतून साकारली त्या कवी प्रदीपजींच्या प्रतिक्षेत पाहुण्याने त्यांची सगळी लोकप्रिय गीतं मनातल्या मनात आळवली.

तोच बाजूच्या खोलीचा दरवाजा उघडल्याचा आवाज आला. नखशिखांत शुभ्र वस्त्रं परिधान केलेले सडसडीत बांध्याचे प्रदीपजी हसून बोलले, 'या.'

पाहुणा अदबीने उभा राहिला. प्रदिपजींनी विचारलं, 'आपलं नाव?'

'सी. अर्जुन, म्युझिक डायरेक्टर.'

'जी.'

'हा, कभी मैं बुलो सी. रानीका असिस्टंट हुआ करता था. वो भी हमारे जातभाई ही थे ना!'

बुलो सी. रानींचं नाव ऐकताच प्रदीपजींना *जोगन*च्या मधुर चाली आठवल्या. त्या माणसाने मीरेच्या भजनांना अप्रतिम चाली लावल्या होत्या. प्रदीपजींच्या मनात आलं, 'ही व्यक्ती जर त्यांची सहाय्यक असेल तर...' 'आइये, पधारिये...' प्रदीपजींनी त्यांचं हसून स्वागत करीत आत नेलं.

आत आल्यावर पाहुण्यांनी प्रदीपजींचे जवळजवळ पायच पकडले. म्हणाले, 'मैंने एक पिक्चर साईन की है. बडी मुश्कील से हाथ लगी है. आपको इस के गाने लिखने होंगे.'

'लिखना तो हमारा पेशा है, भाई', प्रदीपजी हसून म्हणाले. 'इसमें मेरे पॉव पकडने की बात क्या है? भला मैं क्यों ना बोलूंगा?'

'नहीं.' सी. अर्जुन जरा चाचपून बोलले. 'बात कुछ ऐसी है, प्रोड्युसर कुछ नया सा है. शायद आप की पूरी किंमत न दे पाये. इसलिए मैं समझाने आया हूं आपको. आप गाने लिख दीजिये. गानों में जान आ जायेगी तो ही मेरा संगीत चल निकलेगा. मेहरबानी करके मेरी करियर को नजर में रखकर हां बोल दीजिये.'

'अरे भाई' प्रदीपजी समजावणीच्या सुरात म्हणाले. 'पहले आप बतायेंगे कि नही, प्रोड्युसर कौन है?'

'आप नहीं पहचानेंगे प्रदीपजी. हिंदी के लिए बिलकुल नया है– संतराम रोहरा... हमारे जातभाई है– सिंधी.'

असेल. कोणी जन्मतःच यशस्वी निर्माता म्हणून नावारूपाला येत नाही ना? नवोदित असला म्हणून लगेच नकार का द्यायचा? कथेत दम असायला हवा. जी. पी. सिप्पींचा *शोले* सेटवर आहे. सध्या त्याची जबरदस्त हवा आहे. डाकू, बदला आणि प्रेम अशा वेगळ्या विषयावर तो चित्रपट आहे. संतराम रोहरांकडेही असाच काही वेगळा विषय असला तर?' प्रदीपजींनी सूज्ञ विचार केला.

'नाम क्या है पिक्चर का?' प्रदीपजींनी विचारलं. 'स्टोरी क्या है?'

'स्टोरी?' एखाद्या दुसऱ्या भाषेतला शब्द ऐकावा तसं सी. अर्जुनची चमकून बोलले. स्टोरी नही... 'और फिल्म का नाम है *संतोषी माता...*'

प्रदीपजी स्तब्ध झाले. प्रोड्युसर नवा, कथा नवी आणि चित्रपटाचं नाव *संतोषी माता!* हे प्रभु, तुझी लीला अपरंपार आहे. थोडा वेळ विचार करून प्रदीपजी त्या पाहुण्याला म्हणाले, 'अच्छा, आप प्रोड्युसर को मेरे पास भेजिये. बाद में देखा जाएगा.'

* * *

चार दिवसांनंतर...

'आपण संतराम रोहरा?'

'जी'

'काय करता?'

'सरस्वतीबाई मंघाराम नावाच्या एक वृद्ध बाई आहेत. त्यांची मोठी इस्टेट आहे. मी त्यांच्या...'

'त्यांच्या व्यवसायात भागीदार आहात?' प्रदीपजींनी विचारलं. 'की मॅनेजर?'

'नाही.' संतराम उत्तरले. 'त्यांच्या भाडेकरूंकडून भाडेवसूलीचं काम करतो.'

भाडेवसुलीचं काम करणारा एक सामान्य माणूस हिंदी चित्रपट बनवण्याचं स्वप्न बघतो?'

'ही लाईन खूप जोखमीची आहे. वडेबडे तीसमारखां इथे बुडलेत. ठीक आहे, तुम्ही जाणो आणि तुमचं काम. किमान एक सांगा, चित्रपटनिर्मितीचा अनुभव आहे?'

'होय, एक सिंधी चित्रपट बनवला होता. तो फ्लॉप गेला म्हणा...' संतराम उत्तरले.

प्रदीपजींना नीट ऐकू आलं नाही. त्यांनी विचारलं, 'फ्लॉप की टॉप? नीटसं ऐकू आलं नाही.'

'त्याचं असं आहे की तुमचं घर रस्त्याला लागून आहे. त्यामुळे वाहनांच्या आवाजात ऐकू येत नाही,' संतरामनी तक्रार करत म्हटलं.

'असं बघा, खिडक्या बंद केल्या तर उकाड्याने माझा जीव जाईल. काय करणार? सहन करावं लागतं.'

'एक एसी का नाही बसवत?'

प्रदीपजी चमकले. 'या फिल्म लाईनमध्ये गीतकाराला खुली हवा मिळवण्याइतकीही कमाई होत नाही. मग एसीचं स्वप्न पाहणं दूरची गोष्ट.'

संतराम ठामपणे बोलले, 'माझा *जय संतोषी मां* हिट होऊ द्या. तुमच्या या खोलीत मी स्वतः एसी बसवून देईन. हा माझा शब्द.'

'*जय संतोषी मां* बनवणारा नुसती स्वप्नंच बघू शकतो.' प्रदीपजींच्या मनात आलं. 'ठीक आहे. आता मला सांगा. तुमचा कोणी फायनान्सर आहे की नाही?


'आहे ना. केदारनाथ अगरवाल फायनान्स करणार आहेत.'

'त्यांना दुसरी कोणती देवी मिळाली नाही? या संतोषी मातेचं मी आजवर कधी नाव ऐकलेलं नाही की तिचं देऊळ पाहिलेलं नाही.'

'आमच्या फायनान्सरच्या मनात त्या देवीचं मंदिर आहे.'

'ते का?' प्रदीपजींचा पुढचा प्रश्न.

'अगरवालजींना अपत्य नव्हतं. लग्नाला पंधरा-वीस वर्षं झाली. अनेक देवी-देवतांचे उंबरठे झिजवले, पण यश आलं नाही. कोणीतरी संतोषी मातेचं नाव सुचवलं. त्यांनी संतोषी मातेच्या चरणी मस्तक झुकवलं. एका वर्षातच त्यांना मुलगी झाली. त्यांच्याशी माझा थोडाफार परिचय होता. मला चित्रपट निर्मितीत रूची असल्याचं त्यांना माहित होतं. बस्स, संतोषी मातेवर चित्रपट बनवायची त्यांनी मला गळ घातली.'



***जय संतोषी मां*मध्ये अनिता गुहाः बेडा पार करे मां...**

आणि तुम्ही होकार दिलात?

'हो.'

'का?' आणि मग स्वतःच स्वतःच्या प्रश्नाचं उत्तर देत म्हणाले, 'समजलं. तुम्हाला पण मूलबाळ नाही. बरोबर ना?'

'जी', संतराम खाली मान घालून म्हणाले.

'एक काम करा. तुमच्याकडे चित्रपटाचं कथानक असेल तर ते घेऊन या. तुमच्या लेखकाला ते घेऊन मला भेटायला सांगा. मी नक्की गीतं लिहून देईन.'

* * *